प्रभात पुणे, सोमवार, दि. १३ मे २०१९

# पोलीस यंत्रणेकडून पथनाट्य उपक्रमाचे उद्घाटन

प्रभात वृत्तसेवा




**पुणे,दि. १२-** पोलीस यंत्रणेमार्फत नागरिकांना तत्काळ सेवा उपलब्ध व्हावी यासाठी अनेक वेगवेगळे उपक्रम सुरू असतात याबाबतची माहिती जनतेपर्यंत पोहोचावी म्हणून जनजागृती करण्यासाठी पथनाट्यांची मदत घेण्यात येणार आहे. पुणे पोलीस, पंख सामाजिक संस्था आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या मार्फत हा पथनाट्य उपक्रम राबवण्यात येणार आहे. नुकतेच पोलीस आयुक्त व्यंकटेशंम यांच्या हस्ते पथनाट्य उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते. डॉ. के. व्यंकटेशम, सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी, क्विक हिल फाउंडेशनचे सी.एस.आर प्रमुख अजय शिर्के, पंख संस्था अध्यक्ष स्मिता आपटे, ट्रस्टी कल्याणी भाबड आणि इतर पंख संस्था कर्मचारी उपस्थित होते.

पथनाट्यांमार्फत या विषयांबाबत जनजागृती करणे व पोलीस यंत्रणेत नागरिकांसाठी राबवत असलेल्या सेवांबाबत जनतेला माहिती करून देणे हा या पथनाट्य उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पुणे शहरातील एकूण ३० वस्त्यांमध्ये पथनाट्ये सादर होतील.